**<u>ठळक बातम्या</u>**

- पश्चिम बंगाल आणि तामीळनाडूत विधानसभा निवडणुकीचा प्रचार शिगेला, प्रमुख नेत्यांच्या विविध ठिकाणी सभा

- इराणनं होर्मुझच्या सामुद्रधुनीत शस्त्रसंधी कराराचं उल्लंघन केल्याचा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा आरोप, मात्र इराणसोबत वाटाघाटी करण्यासाठी अमेरिकेचं शिष्टमंडळ पाकिस्तानला जाणार

- तामिळनाडूमध्ये फटाक्यांच्या कारखान्यात झालेल्या स्फोटात २१ कामगारांचा मृत्यू

- भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या वरिष्ठ निवड समितीचे अध्यक्ष म्हणून अजित आगरकर यांना मुदतवाढ

- **आणि**
- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत कोलकात्त्यात झालेल्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सचा राजस्थान रॉयल्सवर ४ गडी राखून विजय

**<><><><><>**

पश्चिम बंगाल आणि तामीळनाडूत विधानसभा निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहचला आहे. विविध राजकीय पक्षांचे प्रमुख नेते ठिकठिकाणी प्रचार सभा आणि रोड शो घेत आहेत.

भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज झारग्राम, पुरुलिया आणि बिष्णुपूर जिल्ह्यात प्रचार सभांना संबोधित केलं. तृणमूल काँग्रेसनं काँग्रेससोबत मिळून कायदेमंडळातल्या महिलांच्या प्रवेशाला खीळ घालण्याचं काम केलं असं ते म्हणाले.

**होल्ड - बाईट - प्रधानमंत्री (महिला आरक्षण)**

तृणमूल काँग्रेसनं जनतेच्या समस्यांकडे दुर्लक्ष करून केवळ भ्रष्टाचार आणि खंडणीखोरीला खतपाणी घातल्याची टीका त्यांनी यावेळी केली.

भाजपाचे नेते जे.पी. नड्डा हे जलपाईगुडी जिल्ह्यात तर माणिक सहा यांनी मुर्शिदाबाद जिल्ह्यात जियागंज आणि कांडी इथं रोड शोमध्ये सहभागी झाले.

तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्ष आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनीही हुगळी जिल्ह्यात तारकेश्वर आणि पूर्व वर्धमानमध्ये कालना इथं प्रचारसभा घेतल्या. वर्धमान इथं त्यांनी रोड शो ही केला. राज्यात भाजप सत्तेवर आलं तर सर्व लोककल्याणकारी योजनांचे फायदे काढून घेतले जातील असं त्या म्हणाल्या. केंद्र सरकारनं लोकसभेत मांडलेल्या महिला आरक्षण विधेयक मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाशी जोडलं असा आरोपही त्यांनी केला.

काँग्रेस, डावे पक्ष आणि इतर राजकीय पक्षही पश्चिम बंगालमध्ये जोरदार प्रचार करत आहेत.

तमिळनाडूत भाजपाचे नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी इरोडमध्ये शिवगिरी आणि मोडाकुरुची इथं प्रचार केला. द्रमुक सरकार निष्क्रिय असून त्यांनी लोककल्याणाकडे दुर्लक्ष केल्याची टीका त्यांनी केली. अण्णा द्रमुकचे सरचिटणीस एडप्पाडी के. पलानीस्वामी यांनी नामक्कल इथं प्रचार केला. आपला पक्ष सत्तेवर आल्यास शेतकऱ्यांना चौदाशे युनिट मोफत वीज देण्याची घोषणा त्यांनी केली.

काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी तामीळनाडूच्या उत्तरेकडेच्या जिल्ह्यांमध्ये आपल्या उमेदवारांचा प्रचार केला. राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव यांनीही कोईम्बतूर, तिरुपूर आणि निलगिरी भागात धर्मनिरपेक्ष पुरोगामी आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचार फेरीत सहभाग घेतला. तर कणिमोळी यांनी वृद्धाचलम इथं प्रचार केला. टीव्हीके पक्षाच्या नेत्यांनीही तिरुचिरापल्ली पूर्व इथं रोड शो केला.

<><><><><>

इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनी इथं शस्त्रसंधी कराराचं उल्लंघन केल्याचा आरोप अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे. फ्रेंच आणि ब्रिटनच्या जहाजांना इराणने लक्ष्य केल्याचं ते म्हणाले. दुसरीकडे इराणसोबत वाटाघाटी करण्यासाठी अमेरिकेचं शिष्टमंडळ पाकिस्तानला जात असल्याचंही ट्रम्प यांनी सांगितलं. अमेरिकेनं इराणसमोर न्याय्य प्रस्ताव ठेवला असून इराण याचा स्वीकार करेल अशी आशा त्यांनी व्यक्त केली. ही चर्चा अयशस्वी झाली तर इराणच्या वीज प्रकल्पांवर आणि पुलांवर हल्ला केला जाईल असा इशाराही ट्रम्प यांनी केला.

अमेरिकेसोबतच्या शांतता करारात पुढं काहीही प्रगती झाली नाही असं इराणच्या संसदेचे सभापती मोहम्मद बाघेर गालिबाफ यांनी म्हटलं आहे. चर्चेत काही मुद्द्यांवर सहमती

झाली आहे, मात्र अजूनही काही मूलभूत मुद्दे प्रलंबित आहेत, त्यामुळे अंतिम चर्चेपासून इराण-अमेरिका दूर असल्याचं ते म्हणाले. इराण आपल्या राष्ट्रीय हिताशी कधीही तडजोड करणार नाही असं त्यांनी स्पष्ट केलं.

<><><><>

दक्षिण कोरियाचे अध्यक्ष ली जे म्युंग हे तीन दिवसांच्या दौऱ्यासाठी आज नवी दिल्लीत दाखल झाले. केंद्रीय मंत्री हर्ष मल्होत्रा यांनी त्यांचं स्वागत केलं. म्युंग यांच्या सोबत त्यांची पत्नी किम हे क्युंग तसंच, मंत्री, वरिष्ठ अधिकारी आणि व्यावसायिकांचा समावेश असलेलं एक उच्चस्तरीय मंडळ आलं आहे. म्युंग यांचा हा पहिलाच भारत दौरा आहे. या दौऱ्यात ते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याबरोबर विविध क्षेत्रांमधलं द्विपक्षीय सहकार्य बळकट करण्याबाबत चर्चा करतील. या क्षेत्रांमध्ये जहाजबांधणी, व्यापार, गुंतवणूक, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सेमीकंडक्टर्स, महत्वपूर्ण आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक देवाणघेवाण यांचा समावेश आहे. या चर्चेनंतर ते राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेणार आहेत. ली जे म्युंग यांच्या सन्मानार्थ विशेष भोजनाचं आयोजनही करण्यात आल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाने आपल्या निवेदनात दिली आहे.

<><><><>

देशभरात आज अक्षय्य तृतीयेचा सण उत्साहात साजरा होत आहे. अक्षय्य तृतीयेच्या निमित्तानं महाराष्ट्रात मुंबईसह राज्यभरात सणाचा उत्साह आहे.

आजच्या मुहूर्तावर राज्यात मोठ्या प्रमाणात विवाह सोहळे देखील होतात. हे लक्षात घेऊन, राज्य शासनानं बाल विवाह रोखण्यासाठी कडक उपाययोजना केल्या आहेत. यंदा, सोन्याचे दर विक्रमी पातळीवर असले, तरी सोनं खरेदीचा उत्साह मात्र कायम आहे.

आज परशुराम जयंती आणि महात्मा बसवेश्वर यांची जयंती देखील साजरी होत आहे. त्या निमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, राज्यपाल जिष्णु देव वर्मा आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><>

तामिळनाडूमध्ये मुथुलिंगापुरम इथल्या एका फटाक्यांच्या कारखान्यात आज दुपारी झालेल्या स्फोटात २१ कामगारांचा मृत्यू झाल्याचं वृत्त आहे. स्फोटात ६ जण गंभीर जखमी झाले असून, त्यांना जवळच्या रुग्णालयात दाखल केलं आहे. कारखान्यातला ज्वलनशील

रासायनिक पदार्थ हलवला जाताना हा स्फोट झाला. दुर्घटनेतल्या मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता  आहे.

तामिळनाडूमधल्या दुर्घटनेत झालेल्या जीवित हानीबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दुःख व्यक्त केलं आहे. दुर्घटनेतल्या मृतांच्या कुटुंबीयांप्रति त्यांनी सह-वेदना व्यक्त केली असून,  जखमींच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी अशी प्रार्थना केली आहे.

<><><><><>

बीसीसीआय अर्थात भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं वरिष्ठ निवड समितीचे अध्यक्ष म्हणून अजित आगरकर यांचा कार्यकाळ एका वर्षानं वाढवला आहे. २०२७ च्या एकदिवसीय क्रिकेट विश्वचषकाच्या तयारीच्या दृष्टीनं हा निर्णय घेतला असल्याचं नियामक मंडळानं म्हटलं आहे. जुलै २०२३ मध्ये आगरकर यांची वरिष्ठ निवड समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली होती. त्यानंतर त्यांच्या आत्तापर्यंतच्या कार्यकाळात निवडलेल्या भारतीय संघांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या वतीनं आयोजित चार स्पर्धांच्या अंतिम फेरीत धडक मारली, आणि त्यापैकी दोन टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक तसंच, एका आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेचं विजेतेपदही पटकावलं आहे.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज कोलकत्त्याच्या ईडन गार्डन मैदानावर झालेल्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सनं राजस्थान रॉयल्सवर ४ गडी राखून विजय मिळवला. राजस्थान रॉयल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला, आणि निर्धारित २० षटकात ९ गडी गमावून १५५ धावा केल्या. कोलकाता नाईट रायडर्सनं ६ गड्यांच्या मोबदल्यात, सामन्यातले २ चेंडू बाकी असताना ही धावसंख्या पार करत १६१ धावा केल्या. रिंकू सिंगच्या नाबाद ५३ धावांचा या विजयात मोलाचा वाटा आहे. अनुकूल रॉयनं नाबाद २९ धावांचं योगदान दिलं.

या स्पर्धेतला आजचा दुसरा सामना चंदीगढ इथं पंजाब किंग्ज आणि लखनौ सुपर जायंट्स यांच्यात सुरु आहे. लखनौ सुपर जायंट्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा पंजाब किंग्जच्या ८ षटकात १ बाद ९१ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

भारत आणि दक्षिण आफ्रिकेच्या महिला क्रिकेट संघांत डर्बन इथं सुरु असलेल्या टी ट्वेंटी क्रिकेट सामन्यात भारतानं दक्षिण आफ्रिकेसमोर विजयासाठी १४८ धावांचं आव्हान ठेवलं आहे. या सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं नाणेफेक जिंकून पहिली गोलंदाजी घेतला. पहिली फलंदाजी करताना भारताची सलामीवीर शेफाली वर्मा शिवाय भारताच्या इतर कोणत्याही खेळाडूला खेळपट्टीवर जम बसवता आला नाही. शेफाली ही सर्वाधिक ५७ धावा केल्या. निर्धारीत २० षटकांत भारत केवळ सर्व बाद १४७ धावाच करू शकला.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा दक्षिण आफ्रिकेच्या १३ षटकात १ बाद १०८ धावा झाल्या होत्या.

पाच टी ट्वेटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतला हा दुसरा सामना असून, पहिला सामना दक्षिण आफ्रिकेनं जिंकला होता.

//<><><><><>//